**Indian Academy of Pediatrics (IAP)**

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण ७४ :**

# लकवाग्रस्त अपंग मुलाची घरी घ्यावयाची काळजी


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. जयंत पांढरीकर

पुनरावलोकन : डॉ. सदाचार उजळंबकर

श्री. उज्ज्वल करमळकर

*Convener:* Harsh Patel

*Members:* Ajay Srivastava, Omkar P Hajirnis, Sushma Uttam Save

*Reviewer:* Arushi Gahlot




जन्मापासून मोठे होईपर्यंत अनेक कारणांनी मुलांना लकव्याचा त्रास होऊ शकतो. जरी हा त्रास ओळखला तरी त्यातून पूर्णपणे मुल बरे होईलच असे नाही. हात किंवा पाय नीट न चालत असल्यामुळे त्यांना अनेक प्रकारची मदत पालकांना करावी लागते. आजच्या चर्चेत ही मदत कशी करायची याचा आपण परामर्श घेऊया.

**"लकवाग्रस्त अपंग मुलाची घरी घ्यावयाची काळजी या विषयावर वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न"**

प्र.१ लकवा म्हणजे काय ? ह्याने मुलांच्या जीवनावर काय परिणाम होतो ?

प्र.२ मुलांमध्ये लकवा होण्याची साधारण कुठली कारणं आहेत?

प्र.३ ज्यांना लकवा झालेला आहे अशा सर्वच मुलांना रुग्णालयात भरती करावे लागते काय? मी माझ्या मुलाला बालरोगतज्ञांना किंवा बालमेंदूरोगविकार तज्ञांना ताबडतोब दाखवायला हवे अशी धोक्याची लक्षणं कोण कोणती आहेत?

प्र.४ माझ्या "लकवाग्रस्त मुलाला डॉक्टरांनी मज्जातंतू विषयक पुनर्वसन" सुचविले आहे, ते नेमके काय आहे? आणि ते कसे कार्य करते?

प्र.५ लकवाग्रस्त मुलाची घरी काळजी घेत असताना काय करायचे व काय करायचे नाही हे थोडक्यात सांगा.

प्र.६ माझ्या लकवाग्रस्त मुलाची खाण्यापिण्याची व आहाराची काय काळजी घ्यावी?

प्र.७ माझ्या लकवाग्रस्त मुलाचे नियमित लसीकरण करावे काय?

प्र.८ नुकताच माझ्या मुलाला लकवा झालेला आहे. त्याला किंवा तिला जे अपंगत्व आले आहे ते कायमस्वरुपी राहील काय? ते किंवा ती पूर्णपणे पूर्ववत होऊ शकेल काय?

प्र.९ ज्या मुलाला लकवा झालेला आहे. त्यामध्ये ताबडतोब किंवा दुरगामी दुष्परिणाम काय होऊ शकतात?

प्र.१० माझ्या लकवाग्रस्त मुलाच्या बुद्धिमत्तेवर काही फरक पडू शकतो काय? तो इतर मुलांसारखे नियमित शाळेत जाऊ शकतो का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 20202021**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 20202021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# ७४

# लकवाग्रस्त मुलाची घरी घ्यावयाची काळजी


प्र. १

## लकवा म्हणजे काय ? ह्याने मुलांच्या जीवनावर काय परिणाम होतो ?

उत्तर : शरीराच्या नेहमीच्या हालचाली आपण या आधी आपल्याला हव्या तशा करु शकत होतो. त्या ह्या आजारामुळे करु न शकणे, ह्याला लकवा गेला असे म्हणतात. सोप्या शब्दात सांगायचे म्हटलं तर मांसपेशीचे जे कार्य असते ते काही प्रमाणात/अंशत: किंवा पूर्णपणे करता न येणे.

वैद्यकीय भाषेत त्याला पॅरालीसीस असे म्हणतात. हा अनेक कारणांमुळे होऊ शकतो. उदा. जनुकीय कारणे किंवा जन्मानंतर देखील अनेक कारणांमुळे होऊ शकतो. लकवा हा काही वेळा करता किंवा कायमस्वरुपी देखील राहू शकतो. त्याची तीव्रता देखील वेगवेगळी असू शकते. पॅरालीसीस म्हणजे शरीराच्या एका भागाचा लकवा जाणे उदा. एक हात किंवा एक पाय किंवा चेहरा यामध्ये लकवाग्रस्त होऊ शकतो. त्याला लोकलाईझड असे म्हणतात. सर्व साधारण लकवा म्हणजे शरीरातील निरनिराळ्या भागातील मांसपेशी काम न करणे.

लकव्याच्या तीव्रतेनुसार मांसपेशीच्या कार्यक्षमतेवर बराच परिणाम होतो, निरनिराळ्या सांध्यांच्या हालचालींवर परिणाम होऊ शकतो. एकतर स्नायू म्हणजेच मांसपेशी अगदी कडक होतात किंवा वाकड्या होतात. अशी काही मुलं चालू शकतात परंतु काहींना मात्र आधार लागतो. अशा मुलांची बुद्धिमत्ता बरेचदा सर्वसाधारण असते परंतु काही मुलांमध्ये बुद्धिमत्तेवर देखील परिणाम होऊ शकतो. लकवा असलेल्या मुलांना चावण्याकरता किंवा घास घेण्याकरता देखील त्रास होऊ शकतो. मिर्गी किंवा अपस्मार, दृष्टीदोष किंवा कर्णदोष हे देखील लकव्यांसोबत राहू शकतात.




**चित्र १ : निरनिराळ्या प्रकारच्या लकव्यांमध्ये शरीराचे कुठले अंग लकवाग्रस्त होतात हे दर्शविले आहे.**

प्र. २

## मुलांमध्ये लकवा होण्याची साधारण कुठली कारणं आहेत?

उत्तर : मांसपेशींचे कार्य हे मेंदूतून निघणाऱ्या संकेत संदेशावरुन नियंत्रित केले जाते आणि ते मज्जारज्जूमधून चेतापेशीमार्फत मांसपेशीपर्यंत पोहचतं. मेंदू ते मांसपेशी ह्या दरम्यान जर कुठे काही इजा झाली तर हे संदेश मांसपेशीपर्यंत पोहोचू शकत नाही आणि त्यामुळे लकवा होतो. "सेरेब्रल पाल्सी" हा सर्वात जास्त दिसणारा लकव्याचा प्रकार मुलांमध्ये आढळून येतो. सेरेब्रल पाल्सीलाच सीपी असे म्हणतात. यामध्ये असे अनेक आजार मोडतात. ज्यामध्ये शरीराच्या सांध्यांच्या हालचाली काम करत नाहीत किंवा शरीराच्या इतर अवयवांवर परिणाम होतो. त्याची तीव्रता ही रुग्णपरत्वे भिन्न असू शकते. सेरेब्रल पाल्सी यामध्ये मुलाच्या विकसित होणाऱ्या मेंदूवर दुष्परिणाम होऊन मेंदूची वाढ पूर्णपणे होऊ शकत नाही. अर्थातच सर्वच प्रकारचा लकवा हा सेरेब्रल पाल्सी नसतो.

मुलांना सर्वसाधारण किंवा एका विशिष्ट भागाचा लकवा होऊ शकतो आणि हा मुलाच्या मेंदू, स्पाइनल कॉर्ड (मज्जारज्जू), मज्जातंतू किंवा मांसपेशींना इजा झाल्यामुळे होऊ शकतो.

**मुलांमध्ये लकव्याची सर्वसाधारण कारणे :-**

★ जनुकीय बदलांमुळे मज्जातंतू सिस्टीमची वाढ न होणे किंवा जन्मत: मेंदूमध्ये दोष असणे.

★ जन्माच्या वेळी बाळाचा श्वास कोंडणे व श्वासाची सुरुवात होण्यास विलंब होणे.

★ संसर्गजन्य आजार आईच्या गर्भाशयात असताना होणे किंवा जन्मानंतर लगेच मेंदूज्वर होण। (मेनिन्जायटिस (मेंदूच्या आवरणाला सूज) एनकेफालाइटीस (मेंदूला सूज)

★ जन्माच्या वेळी किंवा जन्मानंतर मेंदूमध्ये रक्तस्राव होणे किंवा रक्त गोठणे.

★ गुलेन बारी सिंड्रोम हा जन्मानंतर होणारा आजार आहे. ज्यामध्ये शरीरातील अनेक मज्जातंतू, पेशीवरपरिणाम होऊन त्या निकामी होतात.

★ डोक्याला व मज्जारज्जूला इजा होऊन अपघात होणे.

★ ब्रेन ट्यूमर किंवा ब्रेनचा कॅन्सर.

## प्र. ३

## ज्यांना लकवा झालेला आहे अशा सर्वच मुलांना रुग्णालयात भरती करावे लागते काय? मी माझ्या मुलाला बालरोगतज्ज्ञांना किंवा बालमेंदूरोगविकार तज्ज्ञांना ताबडतोब दाखवायला हवे अशी धोक्याची लक्षणं कोण कोणती आहेत?

उत्तर : जर मुलाला अगदी ताबडतोब/अचानक/एवढ्यातच लकवा झाला असेल तेव्हा त्याला भरती करण्याची गरज भासू शकते, जेणेकरुन त्या लकव्याचे कारण काय याकरिता तपासणी करणे सोयीचे जाते. तसेच त्याचे निदान, इलाज व पुढील उपचाराकरता देखील ते सोयीचे असते. जर मुलाला भरती करण्याची आवश्यकता नाही. तरीपण विशिष्ट रुग्णांमध्ये लकव्याचे कारण शोधण्याकरिता किंवा पुन्हा होऊ नये याकरिता काही काळ भरती करावे लागू शकते.

**खालील काही धोक्याची लक्षणे आढळल्यास तुम्ही ताबडतोब बालरोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.**

१. शरीराचा काही भाग किंवा पूर्णपणे शरीर एकदम निकामी होणे.
२. झटके येणे.
३. झटका येण्या सोबतच मुलगा बेशुद्ध होणे, विचित्र हालचाली करणे.
४. वागणुकीतील समस्या
५. सुस्त होणे.
६. दूध न पिणे.
७. श्वास घेण्याचा त्रास होणे, श्वासनलिकेचा वारंवार ससंर्ग होणे.
८. ताप येणे.
९. शरीराचा वाढता फिकेपणा/पांढुरकेपणा
१०. डोके दुखणे.
११. झोपेचे चक्र बिघडणे
१२. बद्धकोष्ठता होणे.
१३. मांस पेशींची कमजोरी वाढत जाणे, खालून वरपर्यंत किंवा वरुन खालपर्यंत.
१४. लघवी व संडास न होणे.

प्र.४

## माझ्या "लकवाग्रस्त मुलाला डॉक्टरांनी मज्जातंतू विषयक पुनर्वसन" सुचविले आहे, ते नेमके काय आहे? आणि ते कसे कार्य करते?

उत्तर : ज्यामध्ये मेंदूच्या पेशी किंवा मेंदूपासून मांसपेशी पर्यंत असणारे मज्जातंतू ह्यांचे काही कारणाने नुकसान झालेले असते, त्याचे जास्तीत जास्त पुनर्वसन करुन ते पुन्हा कशाप्रकारे पूर्ववत करता येईल या पद्धतीला " मज्जा संस्था पुनर्वसन" असे म्हणतात. हे न्युरोप्लास्टीसिटीच्या सिद्धांतावर आधारित आहे. ज्यामध्ये विकसित होणारा मेंदू जो विशिष्ट गोष्टी शिकतो किंवा बाह्य गोष्टींना प्रतिसाद देतो.

मज्जासंस्थेचे पुनर्वसन हे जेव्हा एका ध्येयानी केले जाते, तेव्हा ते खूप जास्त प्रभावी ठरते. तेव्हा ध्येय ठरवणे हा सगळ्यात महत्वाचा भाग यामध्ये समजला जातो, जो सगळ्यात महत्वाचा भाग यामध्ये समजला जातो, जो पालकांनी किंवा उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी किंवा त्यांच्या चमूने ठरवायला हवे.

| उपचार पद्धती | व त्याचा उपयोग |
|---|---|
| १) भौतिक उपचार पद्धती सोबतच जलउपचार पद्धती व हिपोपचार पद्धती.... | याने हातापायातील कडकपणा कमी होण्यास मदत होते त्याचप्रमाणे बसण्यास, चालण्यास, उभे राहण्यास मदत होते. |
| २) व्यावसोपचार पद्धती..... | यामुळे दैनंदिन जीवनामध्ये होणाऱ्या कृतींबाबत मुलगा सक्षम होतो. |
| ३) स्पीच थेरपी अर्थात वाचा उपचार पद्धती..... | यामुळे बोलण्यास, चावण्यास, गिळण्यास मुलाला मदत होते. |
| ४) सी आय एम टी (कन्स्ट्रेण्ड इंडयुस्ड मूव्हमेंट थेरपी)........ | जेव्हा शरीराचा एक भाग लकवा झालेला असतो तेव्हा या उपचार पद्धतीचा खूप फायदा होतो. |
| ५) रोबोटिक डिव्हाईस असिस्टेड मोमेंट थेरपी ही उपचाप पद्धती अगदी नवीनच व फायदेशीर दिसून येणारी आहे.. | यामध्ये विशिष्ट कृती ह्या रोबोटद्वारे करुन घेतल्या जातात जेणेकरुन आपण ठरवलेले लक्ष्य साध्य करण्यास मदत होते. |



**चित्र २ : मज्जासंस्थेचे पुनर्वसनच्या वेगवेगळ्या प्रकारच्या उपचार पद्धती यामध्ये दिल्या आहेत.**

## प्र. ५

## लकवाग्रस्त मुलाची घरी काळजी घेत असताना काय करायचे व काय करायचे नाही हे थोडक्यात सांगा.

**काय करावे .....**

- मुलाची काळजी घेण्यास प्राधान्य द्यावे. त्याच्या तब्येतीबद्दल जाणून घेण्यास नेहमीच विशेष महत्व द्यावे.
- घरगुती उपचार पद्धती एक पालक या नात्याने तुम्ही सर्व उपचार पद्धती करण्याकरता पुढाकार घ्यायला हवा. सर्व उपचार पद्धती पालकांनी शिकून घ्यावा. आणि दररोज घरी मुलाला एक ते दोन तास देऊन त्या मुलाकडून करुन घ्याव्यात जेणेकरुन तुम्हाला उत्तम प्रतिसाद मिळेल.
- घरी करण्याच्या कृती : त्याच्या किंवा तिच्या कार्यक्षमतेप्रमाणे प्रत्येक गोष्ट तुम्ही त्यांच्याकडून करुन घेण्यास हातभार लावावा व त्यांना प्रोत्साहित करावे.
- त्यांच्या विचार कक्षा रुंदावा : तुमच्या मुलाच्या वैचारिक विश्वाला भरपूर वाढू द्या.
- आहार : मुलांना नेहमीच सकस व उत्तम असा आहार द्यावयास हवा.
- जाणीव : तुम्ही त्यांना त्यांच्या गुणांची, शक्तींची जाणीव करुन घ्यायला हवी.
- समदु:खी मदतनीस पालकांचा समूह : यामुळे या कठीण दिवसात देखील तुमचे मनोबल उंचावेल.

**काय करु नये......**

- वारंवार मुलाची काळजी घेणाऱ्या केंद्रामध्ये जावे लागणे किंवा पुन्हा पुन्हा त्याची तपासणी करावी लागणे याबद्दल वाईट वाटून घेऊ नका किंवा मनाला लावून घेऊ नका.
- आंतरजालावरुन (इंटरनेट) मिळणाऱ्या माहितीवर खूप विश्वास ठेवू नका किंवा जाहिरातींवर किंवा कोणी सांगितले म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका.
- उपचार केंद्राच्या विविध पद्धती बद्दल किंवा धोरणाबद्दल जाणून घेण्यास विसरु नका. तेथे घेतल्या जाणाऱ्या उपचारपद्धतीसाठी किती लोकांचा समुह आहे, काय शिकवले जाणार आहे व तुमच्या मुलाच्या संपर्कामध्ये कोण येणार आहे या सर्व बाबींबद्दल माहिती घेण्यास विसरु नका.
- तुमच्या मुलाचे कवच बनू नका. तुम्ही तुमच्या मुलाकडून विपरीत परिस्थितींचा सामना करताना तो त्याच्या पायावर उभा राहू शकेल याची तयारी करुन घ्या. त्याला त्याच्या परिस्थितीशी झगडू द्या व त्याच्या होणाऱ्या परिणामांची त्याला जाणीव करुन द्या.
- तुमच्या मुलाला दुर्लक्षित करु नका किंवा त्याला कमी लेखू नका.

**प्र. ६**

## माझ्या लकवाग्रस्त मुलाची खाण्यापिण्याची व आहाराची काय काळजी घ्यावी?

उत्तर : अशा मुलांच्या मांसपेशींना ताठरता व हालचालीमध्ये दोष असतो. त्याचप्रमाणे त्यांच्या इतर हालचालींमध्ये देखील दोष असतो. काही मुलांमध्ये खाणे, चावणे व योग्यप्रकारे गिळणे या गोष्टींमध्ये समन्वय नसतो. अन्ननलिकेत दोष उदा.: गॅस्ट्रोइसोफिजियल रिफ्लेक्स किंवा बद्धकोष्ठता यामुळे जेवणे किंवा खाणे कठीण जाते. आहार तज्ञ अशा मुलांच्या सर्व समस्या ओळखून त्यांचा आहार तक्ता तयार करतात. याला विशेष महत्व दिले जाते. सूक्ष्म पोषक द्रव्य म्हणजेच मायक्रो न्यूट्रिएंट्स. सूक्ष्म पोषक द्रव्या करिती विशेष महत्व दिले जाते. उदा. : कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह, फॉस्फरस, सल्फर, विटामिन ए,बी,सी आणि डी त्यासोबत मोठे आहार घटक उदा.: प्रथिने, स्निग्ध पदार्थ कर्बोदके इत्यादींचे योग्य ते प्रमाण आहारात ठेवले जाते. जेणेकरुन मलावरोध थांबवता येतो.

चित्र ३: पालकांनी मुलांच्या आहाराची एका डायरींमध्ये नोंद करुन ठेवावी, ज्यामध्ये त्याने कुठले जेवण घेतले आहे, किती प्रमाणात पाणी प्यायले आहे याची नोंद केलेली असेल आणि या नोंवहीचा उपयोग आहार तज्ञांना होईल जेणेकरुन त्याप्रमाणे त्या मुलाच्या आहाराचा तक्ता ते व्यवस्थितपणे तयार करुन मार्गदर्शन करु शकतील. थोडक्यात सांगायचे तर आहार हा गिळण्याकरता, चावण्याकरता सहज सोपा असायला हवा. तसेच त्याची घनता ही योग्य असायला हवी आणि तो दिसताना आकर्षक असायला हवा. त्यामध्ये फळं, भाज्या, दुग्धजन्य पदार्थ असायला हवे. एकंदरीतच मुलाचा आहार हा संतुलित व पौष्टीक असायला हवा जेणेकरुन ते आनंदाने खाऊ शकतील. प्रत्येक वेळी मुलाच्या आहाराबद्दल व त्याच्या तक्त्याबद्दल आपण तज्ज्ञांशी सल्लामसलत करायला हवी आणि तो कसा सुधारता येईल यावर जोर द्यायला हवा.




**चित्र ३ : आहारातील घटक ज्यामध्ये जीवनसत्वे आणि क्षार दर्शविले आहेत.**

प्र. ७

## माझ्या लकवाग्रस्त मुलाचे नियमित लसीकरण करावे काय?

उत्तर : लकवा झालेल्या मुलांमध्ये लसीकरणाचे प्रमाण हे बऱ्यापैकी कमी असते असे आढळून आले आहे. आणि याचे मुख्य कारण म्हणजे पालकांचे अज्ञान, त्यांना असं वाटतं की लसीकरणामुळे अशा मुलांना आणखी गुंतागुंत होऊ शकेल आणि अर्थातच ही माहिती त्यांनी कुठूनतरी चुकीच्या मार्गाने ऐकलेली, माहित करुन घेतलेली असते. त्याचमुळे अशा मुलांमध्ये लसीकरणाचे प्रमाण फार कमी असते. अशी मुलं संसर्ग होण्यासाठी जास्त संवेदनशील असतात.

अशा मुलांमध्ये गुंतागुंत होण्याचे प्रमाण देखील जास्त असते, जे लसीकरण देऊन आपण थांबवू शकतो. पण त्यासोबत रोगप्रतिकारशक्तीही कमी असू शकते आणि त्याचमुळे लसीकरणानंतर होणाऱ्या दुष्परिणामांची शक्यता जास्त असू शकते. विशेषत: जेव्हा जिवंत लस (Live Vaccine) देण्यात येते तेव्हा जर त्या मुलांमध्ये रोग प्रतिकारशक्ती खूप कमी असेल तर दुष्परिणामाची शक्यता असू शकते. तरीही लसीकरण हे सगळ्यात सुरक्षित असते आणि ते नेहमी नियमित द्यावयास हवे. सद्कृतदर्शनी लकवा झालेल्या मुलाला देऊ नये अशी कुठलीही लस नाही. तरीही जिवंत लसींपेक्षा मृतलसी देण्यास प्राधान्य द्यावे. (उपलब्ध असल्यास).

लकव्याचे काही कारणांमध्ये उदा.: मांसपेशी किंवा चेतापेशीचे आजार, ह्यामध्ये वारंवार लसीकरण करावे लागते. तुम्ही मेंदूविकार तज्ञांचा सल्ला घेऊनच लसीकरणाबद्दल ठरवावे असे सुचविले जाते.

सर्वसाधारण लसीकरण वेळापत्रक जे बालरोगतज्ञ संघटनेने सुचविले आहे ते देण्यास योग्य आहे. जरी आजारपणामुळे किंवा इतर काही कारणांमुळे तुम्ही तुमच्या मुलाचे लसीकरण केले नसेल तरी हे सर्व लसीकरण तुमचे बालरोगतज्ञ तुम्हाला पुन्हा सुचवतील व त्यानुसार कुठल्या लसी राहिल्या आहेत ते तुम्हाला घेण्यास सांगतील.

## प्र. ८

## नुकताच माझ्या मुलाला लकवा झालेला आहे. त्याला किंवा तिला जे अपंगत्व आले आहे ते कायमस्वरुपी राहील काय? ते किंवा ती पूर्णपणे पूर्ववत होऊ शकेल काय?

उत्तर : जर तुमच्या मुलाला नुकताच लकवा झालेला असेल, तर त्याला किंवा तिला रुग्णालयात ताबडतोब भरती करणे गरजेचे आहे.जेणेकरुन तिथे त्याच्या काही तपासण्या केल्या जातील. ज्यामुळे आपल्याला ठरवता येईल. त्याला किंवा तिला अपंगत्व कदाचित काही गंभीर नसेलही तरीही ते सर्वस्वी कुठल्या कारणाने झाले आहे यावर अवलंबून असते. जर स्ट्रोक किंवा बेल्स पाल्सी झाले असेल तर तुमचा मुलगा पूर्ण बरा होऊ शकतो. कदाचित त्याला कुठल्या औषधोपचाराची गरजही पडू शकणार नाही आणि त्याला कुठलेही अपंगत्व राहणार नाही किंवा त्याला थोडेफार अपंगत्व राहू शकेल. काही घटनांमध्ये मात्र हे अपंगत्व स्थायी स्वरुपाचे असू शकेल. उदा. : सेरेब्रल पाल्सी जर मेंदूला किंवा मज्जातंतूला इजा पोहोचून तेथे व्रण निर्माण झाले असेल किंवा त्याच्या मज्जातंतुना झाला असेल तर मात्र त्याकरिता सध्याच्या घडीला काहीही उपचार नाहीत. आणि त्यामुळे त्या मुलाला स्थायी स्वरुपाचा लकवा होऊ शकतो. जी मुलं जन्मत:च लकव्यासोबत जन्माला आली असतात त्यांचा लकवा स्थायी स्वरुपाचा नसू शकतो. अर्थात हे सर्व त्यामागील कारणावर अवलंबून असतं. जी मुलं जन्मत:च लकवाग्रस्त असतात ती परिस्थितीशी जुळवून घेत आपल्या सल्ल्यानुसार बहुतांश कृती पूर्णपणे करु शकतात. मज्जा पुनर्वसन उपचार पद्धती जर योग्य प्रकारे वापरली तर त्यांचं संपूर्ण जीवन हे अगदी सर्वसाधारण/नॉर्मल व्यक्ती सारखे असू शकते. परंतु मेंदूला स्थायी स्वरुपाची दुखापत झाल्यास जीवनभर अशा मुलाला अपंगत्व राहू शकते आणि अशा वेळेला त्या मुलाला शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या पालकांवर विसंबून राहावे लागते. पालकांना कदाचित आर्थिक विवंचना असू शकेल परंतु अशा अनेक समाजिक संस्था व मदत करणारे समूह आहेत जे अशा पालकांना मदतीचा हात देतील. त्या व्यक्ति करताच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांकरता सुद्धा लकवा जाणे एक खरोखरच आव्हानात्मक परिस्थिती असते.

अशावेळी नक्कीच हिम्मत हरायची नसते याकरिता संपूर्ण चमूच्या उपचाराची गरज लागते आणि अशा अनेक संस्था किंवा समूह आहेत की जे आर्थिक दृष्या, शारिरीक दृष्ट्या किंवा कायदेशीर दृष्ट्या अशाप्रकारची मदत मुलाला व पालकांना करतात.

प्र. ९

## ज्या मुलाला लकवा झालेला आहे. त्यामध्ये ताबडतोब किंवा दुरगामी दुष्परिणाम काय होऊ शकतात?

उत्तर : यापूर्वी सांगितले आहे की ज्या मुलांना तातडीच्या स्वरुपाचा लकवा बसतो अशांना योग्य त्या उपचाराकरिता रुग्णालयात भरती करणे आवश्यक आहे. तात्पुरते होणारे दुष्परिणाम हे साधारणपणे पहिल्या चार आठवड्यात दिसून येतात आणि त्यावर भरती केल्यावर त्याच डॉक्टरांकडून उपचार केले जातात. हे दुष्परिणाम म्हणजेच झटके येणे, फिटस येणे, बेशुद्ध पडणे, मेंदूवर सूज येणे, एखाद्या हाताला किंवा पायाला लकवा जाऊन ते निकामी होणे किंवा शरीराचा कुठलाही भाग ते निकामी होणे, अनावश्यक हालचाली होणे, वाचा जाणे किंवा दृष्टी जाणे इत्यादी प्रकारचे तूर्तास होणारे दुष्परिणाम असू शकतात. परंतु योग्य त्या उपचारांनी, औषधांनी काही कालावधी नंतर मेंदू हळूहळू सुधारत जातो व तशी सुधारणा इतर अवयवांवर दिसू लागते. कधीकधी थोडाफार प्रमाणात अपंगत्व किंवा शारीरिक अकार्यक्षमता राहू शकते.

लकवा झालेल्या मुलांमधील त्रास व दुष्परिणाम, शारीरिक कमजोरी, ज्यामुळे मोठ्या हालचालींना अडथळा येणे उदा. बसणे, चालणे इत्यादी किती प्रमाणात व कसे हे लकवा झालेल्या केस नुसार ठरते. उदा.: अर्धलकवा ज्यामध्ये शरीराचा एक भाग निकामी होतो. हेमीपरेसीस यामध्ये शरीराचा एक हात किमान एक पाय निकामी होतो. पॅरापरेसिस : यामध्ये शरीराचे दोन्हीही पाय निकामी होतात.

| | |
|---|---|
| क्वाड्रीपरेसिस | यामध्ये दोन्ही हात, दोन्ही पाय असे चारही निकामी होतात आणि लकवा गेलेले हात किंवा पाय एकतर खूप कडक किंवा एकदम ढिले राहू शकतात. |
| झटके येणे | मेंदूला इजा झाल्यानंतर काही काळानंतर किंवा काही महिन्यानंतर देखील झटके येऊ शकतात. |
| संवेदनाक्षम कमजोरी | दृष्टीमध्ये किंवा ऐकण्यामध्ये किंवा इतर संवेदनामध्ये दोष येऊ शकतो.<br>भाषेत विकृती - बऱ्याचशा लकवा झालेल्या मोठ्या मुलांमध्ये भाषेत विकृती राहू शकते. उदा. शब्दांमध्ये जोडाक्षरे किंवा बोलण्याच्या लयीचा ऱ्हास होणे किंवा आवाज बरोबर न निघणे किंवा विशिष्ट प्रकारचा आवाज किंवा अक्षर बोलता न येणे इत्यादी. |
| मूत्र व मल निसारणा संबंधी तक्रारी | काही मुले लघवी करणे किंवा संडास होणे या संदर्भात सांगू शकत नाहीत |
| बेड सोर्स किंवा बेड फोड | बरेचदा ज्या मुलांना दोन्ही हात व दोन्ही पाय याचा लकवा गेला असेल तेव्हा त्याला किंवा तिला बेड फोड होतात. विशेषत: त्या भागावर जो भाग कायम बेडवर असतो. |

प्र.१०

## माझ्या लकवाग्रस्त मुलाच्या बुद्धिमत्तेवर काही फरक पडू शकतो काय? तो इतर मुलांसारखे नियमित शाळेत जाऊ शकतो का?

उत्तर : बुद्धिमत्तेवरील परिणाम हा मेंदूचा कुठल्या भागाला इजा पोहाचली आहे आणि त्या मुलाचे वय काय आहे ह्या बाबींवर अवलंबून असतो. लकव्याच्या काही कारणांमध्ये मेंदूला इजा होत नाही परंतु मज्जारज्जू, मज्जातंतू व मांसपेशींना इजा पोहोचते आणि अशा परिस्थितीमध्ये मुलाची बुद्धिमत्ता ही अबाधित राहते. तथापि एखादा अपघात गर्भावस्थेत किंवा जन्मानंतर पहिल्या वर्षात झाल्यास बुद्धिमत्तेवर परिणाम होऊ शकतो. परंतु एखाद्या मुलाच्या विकसित होणाऱ्या मेंदूवर आघात किंवा बाधा झाल्यास तशा मुलाच्या बुद्धिमत्तेवर जास्त परिणाम होतो. काही परिस्थितींमध्ये उदा. मेंदूचा पुढच्या किंवा बाजूच्या भागावर जर प्रमाणात बाधित होते. परंतु जर इतर भागांवर आघात झाला तर बुद्धिमत्तेवर कमी आघात हातो. लकव्याचे कुठलेही कारण असो परंतु ज्या मुलांना लकवा झालेला आहे, त्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्याची संधी द्यायला हवी. अगदी विशिष्ट केसेस मध्येच जेव्हा त्या मुलाचा बुध्यांक हा खूप कमी असेल किंवा त्याच्या वर्तन समस्या या खूप जास्त प्रमाणात असतील तेव्हा मात्र तशा मुलांना विशेष शाळांमध्ये ठेवण्यासंदर्भात विचार करावयास हवा. विशेष शाळेत ठेवायचे की इतर मुलांसारखे नेहमीच्या शाळेत ठेवायचे हा निर्णय व्यक्तिश: घ्यायचा असतो. मग त्याच्या लकव्याचे प्रमाण व अपंगत्वाचे प्रमाण किती व कसे आहे हे महत्वाचे नसते.